महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
सहायक आयुक्त, समाज कल्याण जळगांव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, मायादेवी मंदिरासमोर, महाबळरोड जळगांव
दुरध्वनी क्र-०२५७-२२६३३२८/२९ Email ID :acswojalgaon@gmail.com

जा.क्र.सआसकजळ/मासशी/प्रलंबित/अर्ज/निकाली/ 1720 / २०२१-२२ जळगाव दि.०९/०४/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व महाविद्यालये
जि .जळगाव.

विषय:-शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील अर्जाबाबत...

संदर्भ:- १. कार्यालयीन पत्र क्र.२०७,२०८,२०९,२१०,व २११ दि.१५.१.२०२१.
२. कार्यालयीन पत्र क्र.६३५ दि.१८.२.२०२१.
३. जिल्ह्यातील विविध वृत्तपत्रात देण्यात आलेली जाहिरात पत्र क्र. ६८५ दि.२३.२.२०२१.
४. दि.२५.२.२०२१ रोजी आयोजित वेबीनार मध्ये महाविद्यालयांना दिलेले निर्देश.
५. कार्यालयीन पत्र क्र.१३५६ दि.१८.३.२०२१
६. कार्यालयीन पत्र क्र.१३५० दि.१९.३.२०२१.
७. मा.आयुक्त,समाज कल्याण ,महाराष्ट्र राज्य ,पुणे यांचे दि.५.४.२०२१ च्या व्हिडीओ कॉन्फरन्समधील सूचना.
८. या कार्यालयाचे पत्र क्र.१६७६ दि.५.४.२०२१.
९. मा.आयुक्त,समाज कल्याण ,महाराष्ट्र राज्य ,पुणे यांचे दि.९.४.२०२१ च्या व्हिडीओ कॉन्फरन्समधील सूचना.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सन २०२०-२१ या शैक्षणीक वर्षातील शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढणेकरीता महाडिबीटी संकेतस्थळ दि. ०३ डिसेंबर २०२० पासून सुरू करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने महाविद्यालयात प्रवेशीत विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता दि. १५ एप्रिल २०२१ हि अंतिम मुदत दिलेली असून सदर कालावधीनंतर विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची सुविधा बंद करण्यात येणार आहे. सदर बाब सर्व महाविद्यालयांचे प्राचार्यांनी प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. दि. १५ एप्रिल २०२१ नंतर विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रणालीत नव्याने अर्ज दाखल करता येणार नाही. तसेच ऑनलाईन प्रणालीत भरलेल्या अर्जांची पडताळणी, करताना या कार्यालयाकडून त्रुटी लावून अर्ज परत आल्यास त्याची त्रुटीपूर्तता करूनच (आवश्यक कागदपत्रे अपलोड करूनच) अर्ज जिल्हा लॉग-इनला पाठविण्यात यावेत.याबाबत आपणास संदर्भ क्र.१ ते ८ अन्वये वारंवार कळविण्यात आले आहे.

मा.आयुक्त समाज कल्याण आयुक्तालय म. रा. पुणे यांचे अध्यक्षतेखाली संदर्भ क्र.९ अन्वये झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स मध्ये ज्या पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मंजुर झाली आहे. मात्र त्याबाबतचे देयक तयार झालेले नाही अशा विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्काची वसुली न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसे केल्याचे आढळल्यास शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दि.०१ नोव्हेंबर २००३ नुसार फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. विहीत मुदतीत विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयाने भरून घेण्याची कार्यवाही पूर्ण करावी. तसे न केल्यास होणा-या आर्थिक नुकसानीस संबंधीत महाविद्यालय/ संस्था जबाबदार राहील. तसेच विद्यार्थ्यांने ऑनलाईन प्रणालीत अर्ज भरूनही महाविद्यालय स्तरावर सदर अर्ज प्रलंबित ठेवल्यास संबंधीत प्राचार्य/ शिष्यवृत्ती कामकाज पाहणारे कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चीत करून आवश्यक कार्यवाही करीता संबंधीत विभागास शिफारस करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(योगेश पाटील)
सहायक आयुक्त,समाज कल्याण,
जळगाव.

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा.प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग, नाशिक.

(योगेश पाटील)
सहायक आयुक्त,समाज कल्याण,
जळगाव.

Scanned by CamScanner